ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार तारीख २० फेब्रुवारी, १९६३ | अंक ४

## विविध माहिती

**शिक्षणावरील खर्चात कपात**—बिहार राज्य सरकारच्या १९६३-६४ च्या शिक्षणावरील खर्चांत कपात करण्यांत आली आहे. हा खर्च मूळच्या रु. ६९०·८६ लाखांवरून रु. ४०० लाखांपर्यंत खाली आणण्यांत आला आहे. तथापि शिष्यवृत्त्या, विद्यार्थ्यांना देण्यांत येणारी आर्थिक मदत, शिक्षकांचें वेतन, आणि शारीरिक शिक्षणावरील खर्च ह्यांच्यावर कपातीचा परिणाम होणार नाहीं.

**सुवर्ण रोखे घेणारांना प्रसिद्धि नको**—जयपूरमधील कांहीं प्रसिद्ध व्यक्तींनीं सुवर्णरोखे खरेदी केले आहेत, परंतु त्यांना आपलीं नांवें वृत्तपत्रांत प्रसिद्ध व्हावयास नको आहेत. अर्थात् योग्य त्या अधिकाऱ्यांना जरूर ती माहिती त्यांना द्यावीच लागते. पिलानी येथील एका बड्या आसामीनें ४,००० रुपयांचे सुवर्णरोखे घेतले पण त्याला स्वतःचें नांव गुप्त ठेवण्याची इच्छा आहे.

**मॉस्कोच्या धोरणाला पाठिंबा**—औटर मंगोलियाच्या पंतप्रधानांनीं मास्कोच्या सहजीवनाच्या धोरणाला पाठिंबा दिला आहे. औटर मंगोलियाचें प्रजासत्ताक राज्य रशिया व चीनच्या मध्यें आहे. १९२१ सालीं हें राज्य चीनमधून फुटून निघालेलें आहे. तेव्हांपासून राज्याच्या चीनकडील सरहद्दीबाबत वाद होता. ही सरहद्द चीननें नुकतीच निश्चित करवून घेतली आहे.

**चीनच्या अणुबॉंबची रशिआला भीति**—अमेरिकेच्या प्रशांत महासागरांतील नौदलाचे सारंग मि. फेल्ट ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, चीन एकदोन वर्षांच्या अवधींत स्वतःच्या प्रायोगिक अणुबॉंबचा स्फोट करील. तथापि ह्या घटनेचा पाश्चात्य देशांपेक्षा रशिआवर अधिक परिणाम होईल. रशिया त्यामुळें अधिक अस्वस्थ होईल.

**इस्पितळासाठी जपानचें साह्य**—उत्तर प्रदेशांत जपानच्या साह्यानें महारोग्यांसाठी एक इस्पितळ काढण्यांत येणार आहे. इस्पितळांत ४० खाटा असतील व त्यांत रोग्यांवरील उपचारांबरोबर रोगासंबंधीं संशोधनहि करण्यांत येईल. इस्पितळासाठी मिळणारी मदत खाजगी स्वरुपाची आहे. त्याच्या स्थापनेसाठी सुरुवातीला २० लाख रुपये लागतील. नित्याच्या खर्चापैकी कांहीं भागहि जपानकडून मिळणार आहे.

**मतदानाच्या हक्काची मागणी**—इराणच्या घटना कायद्याप्रमाणें तेथील पार्लमेंटसाठी होणाऱ्या निवडणुकांत स्त्रियांना मतदानाचा अधिकार नाहीं. इराणमधील स्त्रियांच्या अनेक संघटनांनीं व गटांनीं निवडणुकांत मतदानाच्या हक्काची मागणी केली आहे. इराणच्या शहांनीं नुकत्याच केलेल्या एका भाषणाचा आधार त्यांनीं घेतला आहे.

**गुलमर्गच्या विकासाचे प्रयत्न**—काश्मिरमधील गुलमर्ग ह्या निसर्गरम्य ठिकाणाचा प्रवाश्यांना अधिक उपभोग घेतां यावा म्हणून काश्मीरच्या सरकारनें त्याचा विकास करण्याचें ठरविलें आहे. तेथील जुन्या राजवाड्यांचें रूपांतर प्रवाश्यांच्या हॉटेलमध्यें करण्यांत येणार असून, १ लाख रुपये खर्चून एक बाजारहि बांधण्यांत येणार आहे.

**गंगटोकजवळ तांब्याच्या खाणी**—भारताच्या भूस्तरशास्त्रज्ञांनीं गंगटोकजवळ केलेल्या पाहणींत तांब्याच्या खाणी मोठ्या प्रमाणावर आढळून आल्या आहेत. ह्या विभागाची आणखी कसून पाहणी करण्यांत येणार आहे. सिक्किममधील कांहीं भागांत सांपडलेल्या तांब्याच्या खाणींतून तांबें शुद्ध करण्याचें काम ह्यापूर्वीच चालूं झालें आहे. तांब्याची भट्टी भारताच्या साह्यानें उभारण्यांत आली आहे.

**गोरखपूर येथें खताचा कारखाना**—उत्तरप्रदेशांत गोरखपूर ह्या ठिकाणीं भारताच्या खत-कार्पोरेशननें एक खताचा कारखाना काढण्याचें मुक्रर केलें आहे. कारखाना उभारण्याच्या कामीं कांहीं जपानी कंपन्यांचें साह्य मिळविण्यांत आलें आहे.त्याच्या उभारणीसाठीं ९०० कोटी येन अथवा २·५ कोटी डॉलर्स भांडवल लागणार आहे. कारखाना १९६७च्या वसंत ऋतूंत उत्पादनास प्रारंभ करील.

**कलकत्त्यामधील वाहतुकीची सोय**—कलकत्ता हें शहर भारतामधील सर्वांत दाट लोकवस्तीचें शहर आहे. त्यामुळें त्या शहरांतील वाहतुकीच्या साधनांवर फार ताण पडतो. हा ताण कमी करण्यासाठी झेकोस्लोव्हाकिआकडून २०० ट्रॉली बसेस मिळविण्यासाठी वाटाघाटी चालूं आहेत. भारतामधून यांत्रिक हत्यारें घेण्याबाबत झेक सरकार आस्था दाखवीत आहे.

**विन्स्टन चर्चिल ह्यांचें चरित्र**—ब्रिटनचे वयोवृद्ध मुत्सद्दी मि. विन्स्टन चर्चिल ह्यांचें चरित्र लिहिण्याची परवानगी त्यांचे चिरंजीव मि. रॅडॉल्फ चर्चिल ह्यांना मिळाली आहे. मि. विन्स्टन चर्चिल ह्यांचें वय सध्यां ८८ वर्षांचें असून त्यांच्या चरित्राचे बहुधा ५ खंड होतील. मात्र त्यांपैकीं एकहि खंड ते हयात असेपर्यंत प्रसिद्ध करण्यांत येणार नाहीं.

**भारत-झेकोस्लोव्हाकिआ व्यापार**—झेकोस्लोव्हाकिआच्या व्यापारी प्रतिनिधि मंडळानें नुकताच भारताचा दौरा केला. प्रतिनिधिमंडळानें भारताकडून अधिक माल घेण्याविषयीं आस्था दाखविली. झेकोस्लोव्हाकिआला भारताकडून लोखंडाचें खनिज, मँगेनीझ, मसाल्याचे पदार्थ, कॉफी, इत्यादि मालाची गरज आहे. त्याशिवाय भारताकडून यंत्रसामग्री घेण्याचाहि मंडळाचा मानस दिसला.

ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वार्षिक वर्गणी : ६ रु.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार तारीख २० फेब्रुवारी, १९६३ | अंक ४

## विविध माहिती

**शिक्षणावरील खर्चात कपात**—बिहार राज्य सरकारच्या १९६३–६४ च्या शिक्षणावरील खर्चांत कपात करण्यांत आली आहे. हा खर्च मूळच्या रु. ६९०·८६ लाखांवरून रु. ४०० लाखांपर्यंत खाली आणण्यांत आला आहे. तथापि शिष्यवृत्त्या, विद्यार्थ्यांना देण्यांत येणारी आर्थिक मदत, शिक्षकांचें वेतन, आणि शारीरिक शिक्षणावरील खर्च ह्यांच्यावर कपातीचा परिणाम होणार नाहीं.

**सुवर्ण रोखे घेणारांना प्रसिद्धि नको**—जयपूरमधील कांहीं प्रसिद्ध व्यक्तींनीं सुवर्णरोखे खरेदी केले आहेत, परंतु त्यांना आपलीं नांवें वृत्तपत्रांत प्रसिद्ध व्हावयास नको आहेत. अर्थात् योग्य त्या अधिकाऱ्यांना जरूर ती माहिती त्यांना द्यावीच लागते. पिलानी येथील एका बड्या आसामीनें ४,००० रुपयांचे सुवर्णरोखे घेतले पण त्याला स्वतःचें नांव गुप्त ठेवण्याची इच्छा आहे.

**मॉस्कोच्या धोरणाला पाठिंबा**—औटर मंगोलियाच्या पंतप्रधानांनीं मास्कोच्या सहजीवनाच्या धोरणाला पाठिंबा दिला आहे. औटर मंगोलियाचें प्रजासत्ताक राज्य रशिया व चीनच्या मध्यें आहे. १९२१ सालीं हें राज्य चीनमधून फुटून निघालेलें आहे. तेव्हांपासून राज्याच्या चीनकडील सरहद्दीबाबत वाद होता. ही सरहद्द चीननें नुकतीच निश्चित करून घेतली आहे.

**चीनच्या अणुबाँबची रशिआला भीति**—अमेरिकेच्या प्रशांत महासागरांतील नौदलाचें सारंग मि. फेल्ट ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, चीन एकदोन वर्षांच्या अवधींत स्वतःच्या प्रायोगिक अणुबाँबचा स्फोट करील. तथापि ह्या घटनेचा पाश्चात्य देशांपेक्षा रशिआवर अधिक परिणाम होईल. रशिया त्यामुळें अधिक अस्वस्थ होईल.

**इस्पितळासाठी जपानचें साह्य**—उत्तर प्रदेशांत जपानच्या साह्यानें महारोग्यांसाठी एक इस्पितळ काढण्यांत येणार आहे. इस्पितळांत ४० खाटा असतील व त्यांत रोग्यांवरील उपचारांबरोबर रोगासंबंधीं संशोधनहि करण्यांत येईल. इस्पितळासाठी मिळणारी मदत खाजगी स्वरुपाची आहे. त्याच्या स्थापनेसाठी सुरुवातीला २० लाख रुपये लागतील. नित्याच्या खर्चापैकी कांहीं भागहि जपानकडून मिळणार आहे.

**मतदानाच्या हक्काची मागणी**—इराणच्या घटना कायद्याप्रमाणें तेथील पार्लमेंटसाठी होणाऱ्या निवडणुकांत स्त्रियांना मतदानाचा अधिकार नाहीं. इराणमधील स्त्रियांच्या अनेक संघटनांनीं व गटांनीं निवडणुकांत मतदानाच्या हक्काची मागणी केली आहे. इराणच्या शहांनीं नुकत्याच केलेल्या एका भाषणाचा आधार त्यांनीं घेतला आहे.

**गुलमर्गच्या विकासाचे प्रयत्न**—काश्मीरमधील गुलमर्ग ह्या निसर्गरम्य ठिकाणाचा प्रवाश्यांना अधिक उपभोग घेतां यावा म्हणून काश्मीरच्या सरकारनें त्याचा विकास करण्याचें ठरविलें आहे. तेथील जुन्या राजवाड्याचें रूपांतर प्रवाश्यांच्या हॉटेलमध्यें करण्यांत येणार असून, १ लाख रुपये खर्चून एक बाजारहि बांधण्यांत येणार आहे.

**गंगटोकजवळ तांब्याच्या खाणी**—भारताच्या भुस्तरशास्त्रज्ञांनीं गंगटोकजवळ केलेल्या पाहणींत तांब्याच्या खाणी मोठ्या प्रमाणावर आढळून आल्या आहेत. ह्या विभागाची आणखी कसून पाहणी करण्यांत येणार आहे. सिकिममधील कांहीं भागांत सांपडलेल्या तांब्याच्या खाणींतून तांबें शुद्ध करण्याचें काम ह्यापूर्वीच चालूं झालें आहे. तांब्याची भट्टी भारताच्या साह्यानें उभारण्यांत आली आहे.

**गोरखपूर येथें खताचा कारखाना**—उत्तरप्रदेशांत गोरखपूर ह्या ठिकाणीं भारताच्या खत-कार्पोरेशननें एक खताचा कारखाना काढण्याचें मुक्रर केलें आहे. कारखाना उभारण्याच्या कामीं कांहीं जपानी कंपन्यांचें साह्य मिळविण्यांत आलें आहे. त्याच्या उभारणीसाठीं ९०० कोटी येन अथवा २·५ कोटी डॉलर्स भांडवल लागणार आहे. कारखाना १९६७च्या वसंत ऋतूंत उत्पादनास प्रारंभ करील.

**कलकत्त्यामधील वाहतुकीची सोय**—कलकत्ता हें शहर भारतामधील सर्वांत दाट लोकवस्तीचें शहर आहे. त्यामुळें त्या शहरांतील वाहतुकीच्या साधनांवर फार ताण पडतो. हा ताण कमी करण्यासाठी झेकोस्लोव्हाकिआकडून २०० ट्रॉली बसेस मिळविण्यासाठी वाटाघाटी चालूं आहेत. भारतामधून यांत्रिक हत्यारें घेण्याबाबत झेक सरकार आस्था दाखवीत आहे.

**विन्स्टन चर्चिल ह्यांचें चरित्र**—ब्रिटनचे वयोवृद्ध मुत्सद्दी मि. विन्स्टन चर्चिल ह्यांचें चरित्र लिहिण्याची परवानगी त्यांचे चिरंजीव मि. रँडॉल्फ चर्चिल ह्यांना मिळाली आहे. मि. विन्स्टन चर्चिल ह्यांचें वय सध्यां ८८ वर्षांचें असून त्यांच्या चरित्राचे बहुधा ५ खंड होतील. मात्र त्यांपैकीं एकहि खंड ते हयात असेपर्यंत प्रसिद्ध करण्यांत येणार नाहीं.

**भारत-झेकोस्लोव्हाकिआ व्यापार**—झेकोस्लोव्हाकिआच्या व्यापारी प्रतिनिधि मंडळानें नुकताच भारताचा दौरा केला. प्रतिनिधिमंडळानें भारताकडून अधिक माल घेण्याविषयीं आस्था दाखविली. झेकोस्लोव्हाकिआला भारताकडून लोखंडाचें खनिज, मँगेनीझ, मसाल्याचे पदार्थ, कॉफी, इत्यादि मालाची गरज आहे. त्याशिवाय भारताकडून यंत्रसामग्री घेण्याचाहि मंडळाचा मानस दिसला.

**जुन्या राजवाड्याचा उपयोग**—उदयपूरजवळील मिछोला तलावांत 'जगनिवास' ह्या नांवाचा एक जुना राजवाडा आहे. उदयपूरचे राजे राजवाड्याचा उपयोग उन्हाळ्यांतील निवासस्थान म्हणून करीत असत. आतां ह्या राजवाड्यांत आंतरराष्ट्रीय प्रवाश्यांसाठी एक अलिशान होटेल सुरू करण्यांत येणार आहे. राजवाड्यांत बरीच आधुनिक सुधारणा करण्यांत आली असली तरी त्याचें मूळचें सौंदर्य कायम ठेवण्याची दक्षता घेण्यांत आली आहे.

**भरती-ओहोटीच्या साह्यानें वीज निर्मिति**—रशिआनें उत्तरध्रुव प्रदेशांतील श्वेतसमुद्रावरील भरती-ओहोटीचा फायदा घेऊन विजेची निर्मिति करण्याचें ठरविलें आहे. वीजकेंद्राच्या कामाला चालू वर्षी प्रारंभ करण्यांत येणार असून तें पुरें झाल्यावर १,६०० किलोवॅट वीज निर्माण होऊं शकेल. एवढी वीज एखाद्या छोट्या गांवाला पुरेल. भरती-ओहोटीच्या साह्यानें फ्रान्समध्यें गेलीं कांहीं वर्षें वीज उत्पन्न करण्यांत येत आहे. तथापि अशा प्रकारानें वीज निर्माण करण्याचें तंत्र बरेंच गुंतागुंतीचें आहे.

**पांढऱ्या वाघांचा खर्च परवडेना**—रेवाचे महाराज त्यांच्याजवळील १० पांढरे वाघ लवकरच जंगलांत सोडून देणार आहेत. पांढरा वाघ हा दुर्मिळ प्राणी आहे. महाराजांनीं १९५० सालीं एक पांढरी वाघीण पकडली व नंतर १० पांढऱ्या वाघांची पैदास केली. त्यांचा खर्च चालविण्यासाठी राज्यसरकार अगर भारत सरकार कांहीं मदत करीत नसल्यानें वाघ मुक्त करण्यांत येत आहेत.

**भिलाइ कारखान्यांतील नवी झोतभट्टी**—भिलाई येथील पोलादाच्या कारखान्यांतील ५ व्या झोतभट्टीच्या बांधकामास प्रारंभ झाला आहे. ही झोतभट्टी आशिया खंडांतील सर्वात मोठी होईल. तीमधून दररोज १,५०० टन विडाचें लोखंड निर्माण करतां येईल. भट्टी हिंदुस्थान स्टील लि. तर्फ बांधण्यांत येत आहे.

**कोळशाच्या वाहतुकीसाठी**—कोळशाची वाहतूक अधिक कार्यक्षमतेनें करतां यावी म्हणून पश्चिम रेल्वेनें १९६३ सालीं कांहीं नवीन कामें हातांत घेण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठी रेल्वेला ३·५ कोटी रुपये खर्च येणार आहे. नवीन कामामुळें सौराष्ट्र व गुजरातमधील कारखान्यांना कोळशाचा पुरवठा अधिक नियमितपणें होईल अशी अपेक्षा आहे.

**विजेच्या खपांत कपात**—चित्रपट निर्माण करणाऱ्या स्टुडियोमधून झगझगीत प्रकाश देणारे मोठे विजेचे दिवे व इतर उपकरणें असतात. मद्रास सरकारनें संरक्षणाच्या राष्ट्रीय कामासाठी अधिक वीज मिळावी म्हणून नवा हुकूम जारी केला. आहे. ह्या हुकमाप्रमाणें सायंकाळीं ६ ते रात्रीं १० पर्यंत स्टुडिओमधून विजेच्या मोठ्या दिव्यांना बंदी करण्यांत आली आहे.

**सेवानिवृत्तीच्या वयाचा प्रश्न**—भारत-सरकारनें आपल्या नोकरांचें सेवानिवृत्तीचें वय ५५ ऐवजीं ५८ असें ठरविलें आहे. ह्या प्रश्नासंबंधीं म्हैसूर सरकारनें मध्यवर्ती सरकारला असें कळविलें आहे कीं वयाला ५५ वर्षें पूर्ण झालेल्या आय. ए. एस्. व आय्. पी. एस्. मधील नौकरांना एकदम ५८ वर्षे वयापर्यंत नौकरीवर घेण्यांत येऊं नये. त्याऐवजीं त्यांना नौकरीच्या मुदतींत वार्षिक वाढ देण्यांत यावी.

**गिरण्यांना अधिक कापसाचा पुरवठा**—संरक्षणाच्या कामांत उपयोगी पडण्यासारखा माल निर्माण करणाऱ्या कापड गिरण्यांना परदेशी व देशी कापसाचा खास पुरवठा करण्यांत येणार आहे. मात्र त्यांनीं ह्या कापसाचा उपयोग ज्या कामासाठी तो दिला असेल त्याच कामासाठी करावयाचा आहे. तसें न केल्यास त्यांच्या नेहमींच्या पुरवठ्यांत कपात करण्यांत येणार आहे.


दि सरदार

कारबोनिक गॅस कंपनी लि.

उत्पादक

कारबोनिक ॲसिड गॅस

सुका बर्फ, सोडा वॉटर मशिनरी

आणि

खनिज पाण्याच्या आवश्यकतेसंबंधीं विक्रेते

रजिस्टर्ड हेड ऑफिस आणि एजन्टस्चें ऑफिस

सर विठलदास चेंबर्स, १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

फॅक्टरी ऑफिस : कोनॉट रोड, माझगांव, मुंबई. टे. नं. ४०८१२

शाखा आणि फॅक्टरी

१ केडल रोड, दादर, फिझाइट फॅक्टरी टे. ६११२९
२ काम्पटी फॅक्टरी एरिया, रेल्वे स्टेशनच्या दक्षिणेस, काम्पटी ( कँट ) टे. ८
३ दिल्ली-रामबाग रोड, बंगेश पूल टे. २२४७०२
४ कलकत्ता-१०३ ए फोरशोर रोड, शिवपूर, हावरा. टे. ६७-२२४७
५ विजयवाडा-गुणदला, कृष्णाजी स्ट्रीट, आंध्र प्रदेश टे. २०४१
६ रावळपिंडी-डलहाऊसी रोड.

सर्व शाखांसाठी आणि फॅक्टऱ्यांसाठी टेलिग्राफिक पत्ता : 'कारबोनिक'

# अर्थ

बुधवार, ता. २० फेब्रुवारी, १९६३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद् वामन काळे


## ऑईल इंडिया लि. कंपनीची कामगिरी

भारताच्या संमिश्र अर्थव्यवस्थेतील विभागांत ऑईल इंडिया लि. ही कंपनी स्थापन करण्यांत आलेली आहे. ह्या कंपनींत भारत सरकारचें ५० टक्के भांडवल व बर्मा शेल कंपनीचें ५० टक्के भांडवल गुंतविण्यांत आलेलें आहे. कंपनीनें करावयाच्या कामांत तेलाच्या नव्या विहिरी खोदणें, जुन्या विहिरींचा विकास करणें आणि तेलाच्या वाहतुकीसाठी नळ टाकणें ह्या कामांचा समावेश प्रामुख्यानें करण्यांत आला आहे. ह्या सर्व बाबतींत कंपनी समाधानकारक प्रगति करीत आहे. कंपनीनें आतांपर्यंत १४२ नव्या विहिरींचें खोदकाम केलेलें असून त्यांपैकी १०७ विहिरींत व्यापारीदृष्ट्या फायदेशीर ठरेल इतक्या प्रमाणांत तेलाचा व गॅसचा साठा आढळून आला आहे. १९ विहिरींची अद्याप तपासणी व्हावयाची आहे आणि १६ विहिरी तेलाच्या बाबतींत अनुत्पादक ठरल्या आहेत. विहिरींच्या खोदकामासाठी कंपनीनें १७ कोटी रुपये खर्च केलेले आहेत. दर विहिरीमागें सरासरी १२ लाख रुपये खोदाईचा खर्च आला असा हिशोब बसतो. आसामच्या अधिक दूरच्या विभागांत विहिरी खोदण्याचें काम अधिक खर्चाचें आहे. तथापि, काम अधिक झपाट्यानें व कार्यक्षमतेनें उरकून खोदाईचा खर्च कमी करण्याचे प्रयत्न कंपनीतर्फे करण्यांत येत आहेत. १९६१ सालीं कंपनीनें २० नव्या विहिरी खोदल्या. ह्या विहिरींत तेल लागण्यापूर्वी त्या ९,५०० ते १०,५०० फूट खोल खणाव्या लागल्या. त्या खोदण्यासाठी विहिरीमागें सरासरी ११ दिवस लागले. जगांत इतर ठिकाणीं तेलासाठी करण्यांत येणाऱ्या खोदाईशीं तुलना करतां ही खोदाई बरी झाली असें सांगण्यांत येत आहे.

तेलाच्या वाहतुकीसाठी नळ घालण्याचें कामहि चांगली प्रगति करीत आहे. हें काम दोन टप्प्यांत पुरें करण्यांत यावयाचें आहे. त्यांपैकी पहिला टप्पा नाहरकोटीआ ते गोहाटीपर्यंत १६ इंची नळ टाकण्याचा होता. हें अंतर २५० मैल आहे. गेल्या वर्षी एप्रिलमध्यें हें काम पूर्ण करण्यांत आलें आणि तेलाची वाहतूक सुरू करण्यांत आली. दुसरा टप्पा गोहाटी ते बरौनीपर्यंत तेलाचे नळ टाकण्याचा आहे. ह्या दोन ठिकाणांमधील अंतर ४७० मैल असून वाहतुकीचे नळ १४ इंची व्यासाचे टाकण्यांत आले आहेत. हें काम पूर्ण झालें असून तेलाच्या वाहतुकीची चांचणी मात्र अजून व्हावयाची आहे. गोहाटी ते बरौनी दरम्यानची तेल वाहतुकीची व्यवस्था अगदीं अद्ययावत् पद्धतीची आहे. अंतराच्या दृष्टीनें ही व्यवस्था जगांत दुसऱ्या क्रमांकाची आहे. नळ टाकण्याच्या एकंदर व्यवस्थेसाठीं सुमारें ५० कोटी रुपये खर्च येणार आहे. नाहरकोटीआ येथील तेल बरौनी येथील तेलशुद्धीच्या कारखान्यांत पोंचविण्याचें काम बरेंच अवघड होतें. ह्यासंबंधीं मुद्दाम संशोधन करण्यांत येऊन तेथील अशुद्ध तेलावर संस्कार करून ते नळांतून प्रवाही करण्याच्या कामीं यश मिळविण्यांत आलें. तेलावर जरूर ते संस्कार करण्यासाठी विशिष्ट प्रकारचा कारखानाच उभारावा लागला. हा कारखाना समाधानकारक काम देत आहे असें आढळून आलें आहे. ऑईल इंडिआ कंपनीच्या १९६१ सालच्या अहवालांत ४॥ कोटी रुपयांहून अधिक फायदा दाखविण्यांत आलेला आहे. १९६३ सालांत ही कंपनी आसाममधील तेल विभागांतून २० लाख टन तेल काढूं शकेल असा अंदाज करण्यांत आला आहे.

---

## रशियानें चीनला दिलेली मदत किती ?

चीननें भारतावर आक्रमण केल्यापासून कम्युनिस्ट देशांकडून चीनला देण्यांत येणाऱ्या अगर पूर्वी दिलेल्या मदतीच्या प्रश्नाला कांहींसें उपरें महत्त्व आलें आहे. ह्या संदर्भांत लंडनमधील 'डेली-टेलिग्राफ' ह्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्यांत आलेला एक लेख उद्बोधक आहे. कम्युनिस्ट चीननें कम्युनिस्ट देशांमधील एकजूट मोडण्यास कारणीभूत होणाऱ्या कारवाया थांबविल्या नाहींत तर रशिया चीनला द्यावयाची सर्व आर्थिक मदत बंद करील, अशी धमकी रशियानें चीनला दिल्याचें वरील लेखांत सांगण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें, रशियानें चीनला दिलेल्या मदतीची थोडी-बहुत माहितीहि लेखांत देण्यांत आली आहे. रशियानें चीनला पुरेशी मदत दिली नाहीं, ह्याचा इन्कार रशियातर्फे करण्यांत आला आहे. रशियाच्या म्हणण्याप्रमाणें १९५० पासून १९६१ पर्यंत रशियानें चीनला ३·७४० कोटी डॉलर्स मदतीदाखल दिलेले आहेत. त्याशिवाय इतर कम्युनिस्ट देशांकडून चीनला ह्याच कालांत ७० कोटी डॉलर्स मिळाले आहेत. कोरियाच्या युद्धांत तर रशियानें चीनला व उत्तर कोरियाला तोफा-बंदुकीपासून बुटाच्या बंदापर्यंत सर्व प्रकारची मदत केलेली आहे. रशियानें १४ विमानांचे कारखाने बांधून दिलेले असून त्याशिवाय शस्त्रास्त्रांचे अनेक कारखानेहि उभारून दिले आहेत. ही मदत नसती तर कोरियांत अमेरिकेचें लष्कर आणखी किती पुढें आलें असतें ह्याचा विचार चिनी कम्युनिस्ट आज करीत नाहींत, अशी कोपरखळी रशियानें मारली आहे. शिवाय, सामुदायिक शेती शास्त्रे आस्ते अमलांत आणण्याबद्दलचा रशियाचा सल्ला झिडकारल्याबद्दल चीनला दूषणहि देण्यांत आलें आहे.

---

## झेकोस्लोव्हाकिआला लोकसंख्येंत वाढ हवी

झेकोस्लोव्हाकिआचे खरेदीमंडळ भारतांत आलें असतांना मंडळाच्या पुढाऱ्याला असें सुचविण्यांत आलें कीं, झेक देशांत माणसांचा तुटवडा असल्यानें भारतामधून कांहीं कामगार तिकडे नेण्यांत यावेत. त्यावर झेक सरकार लोकांना अधिक संतति निर्माण करण्यास उत्तेजन देत आहे, अशी माहिती आली. म्हणजे, झेकोस्लोव्हाकियांतील लोकसंख्येचा प्रश्न भारताच्या बरोबर उलट आहे.

---

# भिडे ॲन्ड सन्स प्रा. लि., सांगली

## कर्तबगारीची उज्ज्वल परंपरा



ही पन्नास वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. विनायक पंतोजी तथा कै. विनायक केशव भिडे यांच्या कारकीर्दीत त्यांच्या मुलांपैकी कै. सदाशिवराव तथा भाऊसाहेब भिडे यांनीं सन १९०९ मध्यें "भिडे ॲन्ड् सन्स" चा पहिला बोर्ड सांगलींत लावला.

विनायकरावांचा प्रथम पेशा शिक्षकाचा. म्हणूनच "विनायक पंतोजी" या नांवानें ख्यातनाम. नंतर चुना-विटेचे कारखानदार, सागवानी लाकडाचे व्यापारी, इमारतीचे कॉंट्रॅक्टर आणि शेणामातीपासून ते हिऱ्यामोत्यापर्यंत व टाचणीपासून ते इंजिनापर्यंत सर्व तऱ्हेचा कोणताहि व्यवहार ते सहज करीत असत.

यांची व्यापारी कारकीर्द इ. सन. १९१८ पर्यंत झाली. त्यांचाच वारसा पुढील पिढीनें आजपर्यंत चालविला. कै. विनायकरावांचे ज्येष्ठ चिरंजीव कै. सदाशिवराव यांनीं भिडे कारखान्यांत प्रथम लोखंडी मोटा प्रामुख्यानें बनविल्या. हीच ती आजहि शेतकी विद्यार्थ्यांना शिकविली जाणारी "भिडे मोट". शेंगा यंत्रांचेंहि उत्पादन तेव्हांच सुरू झालें. पण दुर्दैवानें सन १९१९ सालीं त्यांच्या तरुणपणींच मृत्यूनें घाला घातला.

कै. रामभाऊ भिडे, कै. विनायकराव यांचे द्वितीय पुत्र, हे "भिडे ॲण्ड सन्स" च्या संस्थापकांपैकीं एक व भिडे चक्की, आयर्न फाऊंडरी व स्टीम लोकोमोटीव्ह, इत्यादि यंत्रांचें उत्पादक म्हणून प्रसिद्ध होते. सांगली, माधवनगरमधील धंद्याच्या दृष्टीनें मोक्याच्या जागा यांनीं घेऊन ठेविल्या. यांचे कारकीर्दीत भिडे घराणें भरभराटीस आलें. यांची कारकीर्द १९४७ पर्यंत झाली. कै. महादेव विनायक तथा नानासाहेब भिडे ह्यांची कै. रामभाऊंना मदत फारच होत असे. संस्थेच्या ऑफिसच्या कामाची धुरा त्यांनीं १९४६ पर्यंत संभाळली.

कै. विष्णु विनायक तथा आण्णासाहेब भिडे हे टाटा इन्स्टिटयूट-मधून यांत्रिक व तांत्रिक शिक्षण घेऊन सन १९२४ मध्यें रामभाऊंना येऊन मिळाले व तेव्हांपासून कारखान्याचा यांत्रिक विभाग त्यांनीं यशस्वीपणें सांभाळला. लोखंडी फर्निचर, बोरिंग मशिन्स, पॉवरलूम्स, जकाडकार्ड, कटिंग मशिन्स, सेक्शनल वार्पिंग मशिन, भिडे नांगर, इत्यादि अनेक यंत्रांचे उत्पादक. सांगलीच्या जयदेव फॅक्टरीस युद्धकाळांत यांनींच टेप लूम्स् करून दिले. श्रीविनायक वीव्हिंग मिल्सचें चालकत्व यांचेकडेच होतें.

यांचे कारकीर्दीत भिडे घराण्यामध्यें नवीन उद्योगधंद्यांची वाढ झाली. उद्योगधंद्याचे मोठ्या व्यापाकरितां कै. आण्णासाहेब भिडे यांनीं येथील विनायक वीव्हिंग मिल्सच्या, टेपलूम्स् व फाउंडरी या सर्व धंद्याची जबाबदारी श्री. भास्कर रामचंद्र भिडे ( कै. रामभाऊ भिडे यांचे ज्येष्ठ चिरंजीव ) यांचेवर सोपवून माधवनगर कॉटन मिल्स उभी करणेंची जोखीम त्यांनीं स्वतः अंगावर घेतली.


श्री. भास्करराव हे एल्. टी. एम्. असून टेक्स्टाइल धंद्यांत या भागांतील एक तज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांनीं सन १९४२ ते १९४८ पर्यंत पॉवरलूम्स् व टेपलूम्स या उद्योगधंद्याची भरपूर प्रगति केली. लक्षावधि वार टेपची कॉंट्रॅक्टस मोठ्या हिमतीनें पुरीं केलीं. सध्यां विनायक वीव्हिंग मिल्सचें चालकत्व त्यांचेकडे असून भिडे आणि सन्स प्रा. लि. च्या संचालक मंडळापैकीं ते एक आहेत.

कै. रामभाऊ व कै. आण्णासाहेब भिडे यांना त्यांचे धाकटे बंधु श्री. केशव विनायक तथा दादूकाका भिडे यांची मदत फारच झाली. सन १९३० पासून श्री. विनायक वीव्हिंग मिल्सच्या मालाची व भिडे ॲण्ड सन्स यांच्या लोखंडी फर्निचरची विक्रीची सर्व जोखीम श्री. दादूकाका भिडे हेच सांभाळीत असत. पुढें त्यांनीं पुणें, नाशिक, नगर, इत्यादि ठिकाणीं विक्री केंद्रें सुरू केलीं होतीं. हल्लीं तेहि संचालक मंडळावर आहेत.

सन १९४७ ते १९५२ पर्यंतचा काळ "भिडे ॲण्ड सन्स" ला अत्यंत त्रासाचा गेला. घराण्यांतील कर्तबगार मंडळी एकामागून एक नाहींशी झाल्यामुळें घराणें उघडें पडलें. अशा आणीबाणीच्या वेळीं श्री. अ. स. तथा बळवंतराव भिडे यांनीं श्री. रघुनाथराव भिडे यांना हाताशीं धरून या खाजगी संस्थेचें रूपांतर 'भिडे ॲन्ड सन्स प्रा. लि.' मध्यें १९५३ सालीं केलें व या धंद्याची सर्व धुरा श्री. रघुनाथरावांवर सोपविली. ती त्यांनीं यशस्वीपणें सांभाळली आहे. श्री. रघुनाथराव भिडे हे मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून काम पहात असून त्यांच्या कुशल चालकत्वाखालीं "भिडे ॲन्ड सन्स प्रा. लि" ही संस्था प्रगतिपथावर आहे.

श्री. रघुनाथराव एल्. एम्. ई., एल्. ई. ई. इंजिनियर आहेत. जर्मनींत कांहीं काळ त्यांनीं प्रत्यक्ष काम केलें आहे. त्यामुळें सध्यां या कारखान्यामध्यें टेक्स्टाइल मशिनरी, मशीन टूल्स व शेतीचीं सुधारलेलीं यांत्रिक अवजारें तयार होतात. सर्वसाधारणपणें न होणारी अवघड अशी आयर्न कास्टिंग्ज श्री. रघुनाथराव सहजपणें करून देतात. आपल्या कारखान्यांत मेकॅनाइज्ड् फाऊंडरी करण्याचा श्री. रघुनाथराव यांचा विचार आहे.


**ना. यशवंतराव चव्हाण ह्यांची कारखान्याला भेट**



श्री. रघुनाथराव यंत्राची माहिती सांगत आहेत.

# भिडे ॲन्ड सन्स प्रा. लि., सांगली

## कर्तबगारीची उज्ज्वल परंपरा




ही पन्नास वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. विनायक पंतोजी तथा कै. विनायक केशव भिडे यांच्या कारकीर्दीत त्यांच्या मुलांपैकी कै. सदाशिवराव तथा भाऊसाहेब भिडे यांनीं सन १९०९ मध्यें "भिडे ॲण्ड् सन्स" चा पहिला बोर्ड सांगलींत लावला.

विनायकरावांचा प्रथम पेशा शिक्षकाचा. म्हणूनच "विनायक पंतोजी" या नांवानें ख्यातनाम. नंतर चुना-विटेचे कारखानदार, सागवानी लाकडाचे व्यापारी, इमारतींचे कॉंट्रॅक्टर आणि शेणामातीपासून ते हिऱ्यामोत्यापर्यंत व टाचणीपासून ते इंजिनापर्यंत सर्व तऱ्हेचा कोणताहि व्यवहार ते सहज करीत असत.

यांची व्यापारी कारकीर्द इ. सन. १९१८ पर्यंत झाली. त्यांचाच वारसा पुढील पिढीनें आजपर्यंत चालविला. कै. विनायकरावांचे ज्येष्ठ चिरंजीव कै. सदाशिवराव यांनीं भिडे कारखान्यांत प्रथम लोखंडी मोटा प्रामुख्यानें बनविल्या. हीच ती आजाहि शेतकी विद्यार्थ्यांना शिकविली जाणारी "भिडे मोट". शेंगा यंत्रांचेंहि उत्पादन तेव्हांच सुरू झालें. पण दुर्दैवानें सन १९१९ सालीं त्यांच्या तरुणपणींच मृत्यूनें घाला घातला.

कै. रामभाऊ भिडे, कै. विनायकराव यांचे द्वितीय पुत्र, हे "भिडे ॲण्ड सन्स" च्या संस्थापकांपैकीं एक व भिडे चक्की, आयर्न फाऊंडरी व स्टीम लोकोमोटींव्ह, इत्यादि यंत्रांचें उत्पादक म्हणून प्रसिद्ध होते. सांगली, माधवनगरमधील धंद्याच्या दृष्टीनें मोक्याच्या जागा यांनीं घेऊन ठेविल्या. यांचे कारकीर्दीत भिडे घराणें भरभराटीस आलें. यांची कारकीर्द १९४७ पर्यंत झाली. कै. महादेव विनायक तथा नानासाहेब भिडे ह्यांची कै. रामभाऊंना मदत फारच होत असे. संस्थेच्या ऑफिसच्या कामाची धुरा त्यांनीं १९४६ पर्यंत संभाळली.

कै. विष्णु विनायक तथा आण्णासाहेब भिडे हे टाटा इन्स्टिट्यूटमधून यांत्रिक व तांत्रिक शिक्षण घेऊन सन १९२४ मध्यें रामभाऊंना येऊन मिळाले व तेव्हांपासून कारखान्याचा यांत्रिक विभाग त्यांनीं यशस्वीपणें सांभाळला. लोखंडी फर्निचर, बोरिंग मशिन्स, पॉवरलूम्स, जकाडकार्ड, कटिंग मशिन्स, सेक्शनल वार्पिंग मशिन, भिडे नांगर, इत्यादि अनेक यंत्रांचे उत्पादक. सांगलीच्या जयदेव फॅक्टरीस युद्धकाळांत यांनींच टेप लूम्स् करून दिले. श्रीविनायक वीव्हिंग मिल्सचें चालकत्व यांचेकडेच होतें.

ना. यशवंतराव चव्हाण ह्यांची कारखान्याला भेट



श्री. रघुनाथराव यंत्राची माहिति सांगत आहेत.

यांचे कारकीर्दींत भिडे घराण्यामध्यें नवीन उद्योगधंद्यांची वाढ झाली. उद्योगधंद्याचे मोठ्या व्यापाकरितां कै. आण्णासाहेब भिडे यांनीं येथील विनायक वीव्हिंग मिल्सच्या, टेपलूम्स् व फाउंडरी या सर्व धंद्याची जबाबदारी श्री. भास्कर रामचंद्र भिडे (कै. रामभाऊ भिडे यांचे ज्येष्ठ चिरंजीव) यांचेवर सोपवून माधवनगर कॉटन मिल्स् उभी करणेंची जोखीम त्यांनीं स्वतः अंगावर घेतली.

श्री. भास्करराव हे एल् टी. एम्. असून टेक्स्टाइल धंद्यांत या भागांतील एक तज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांनीं सन १९४२ ते १९४८ पर्यंत पॉवरलूम्स् व टेपलूम्स या उद्योगधंद्याची भरपूर प्रगति केली. लक्षावधि वार टेपची कॉंट्रॅक्टस मोठ्या हिमतीनें पुरीं केलीं. सध्यां विनायक वीव्हिंग मिल्सचें चालकत्व त्यांचेकडे असून भिडे आणि सन्स प्रा. लि. च्या संचालक मंडळापैकीं ते एक आहेत.

कै. रामभाऊ व कै. आण्णासाहेब भिडे यांना त्यांचे धाकटे बंधु श्री. केशव विनायक तथा दादूकाका भिडे यांची मदत फारच झाली. सन १९३० पासून श्री. विनायक वीव्हिंग मिलसच्या मालाची व भिडे ॲण्ड सन्स यांच्या लोखंडी फर्निचरची विक्रीची सर्व जोखीम श्री. दादूकाका भिडे हेच सांभाळीत असत. पुढें त्यांनीं पुणें, नाशिक, नगर, इत्यादि ठिकाणीं विक्री केंद्रें सुरू केलीं होतीं. हल्लीं तेहि संचालक मंडळावर आहेत.

सन १९४७ ते १९५२ पर्यंतचा काळ "भिडे ॲण्ड सन्स" ला अत्यंत त्रासाचा गेला. घराण्यांतील कर्तबगार मंडळी एकामागून एक नाहींशी झाल्यामुळें घराणें उघडें पडलें. अशा आणीबाणीच्या वेळीं श्री. अ. स. तथा बळवंतराव भिडे यांनीं श्री. रघुनाथराव भिडे यांना हाताशीं धरून या खाजगी संस्थेचें रूपांतर 'भिडे ॲन्ड सन्स प्रा. लि.' मध्यें १९५३ सालीं केलें व या धंद्याची सर्व धुरा श्री. रघुनाथरावांवर सोपविली. ती त्यांनीं यशस्वीपणें सांभाळली आहे. श्री. रघुनाथराव भिडे हे मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून काम पहात असून त्यांच्या कुशल चालकत्वाखालीं "भिडे ॲन्ड सन्स प्रा. लि" ही संस्था प्रगतिपथावर आहे.

श्री. रघुनाथराव एल्. एम्. ई., एल्. ई. ई. इंजिनियर आहेत. जर्मनींत कांहीं काळ त्यांनीं प्रत्यक्ष काम केलें आहे. त्यामुळें सध्यां या कारखान्यामध्यें टेक्स्टाइल मशिनरी, मशीन टूल्स व शेतीचीं सुधारलेलीं यांत्रिक अवजारें तयार होतात. सर्वसाधारणपणें न होणारी अवघड अशी आयर्न कास्टिंग्ज श्री. रघुनाथराव सहजपणें करून देतात. आपल्या कारखान्यांत मेकॅनाइज्ड् फाऊंडरी करण्याचा श्री. रघुनाथराव यांचा विचार आहे.

## कोलार येथील सोन्याच्या खाणी

गेल्या ऑक्टोबरमध्यें राष्ट्रीय आणीबाणीची परिस्थिति जाहीर करण्यांत आली तेव्हांपासून सरकारनें सोन्याबाबत महत्त्वाच्या तीन उपाययोजना जाहीर केल्या. त्याप्रमाणें म्हैसूर सरकारच्या अखत्यारीखाली असलेली कोलार सोन्याची खाण ही १ डिसेंबर, १९६२ पासून मध्यवर्ती अर्थखात्याकडे आली. सध्यां या खाणीचा कारभार एका व्यवस्थापक मंडळाकडे असून स्वतः अर्थमंत्रीच त्याचे अध्यक्ष आहेत.

### पूर्वेतिहास

लंडन येथील टेलर ॲण्ड सन्स या खाजगी कंपनीच्या भारतीय शाखेकडून म्हैसूर सरकारनें ह्या खाणी १९५६ मध्यें घेतल्या तेव्हांच त्यांचें राष्ट्रीयीकरण झालें. त्यापूर्वी म्हैसूर सरकार त्या कंपनीकडून या खाणींतिल सोनें विकत घेऊन तें मुंबईतील सोन्याच्या बाजारांत विकत असे. राष्ट्रीयीकरण झाल्यापासून या खाणींतील सर्व उत्पादन भारत-सरकार विकत घेईल; परंतु सोन्याची जी आंतरराष्ट्रीय किंमत आहे त्यापेक्षा भारत सरकारला यासाठी अधिक किंमत देणें शक्यच नव्हतें; आणि म्हणून या खाणींचा कारभार स्वतः मध्यवर्ती सरकारनें आपल्याकडे घेणें हाच यावरील एक तोडगा होता; त्याखेरीज भारत सरकारकडे या खाणी गेल्यानें भारत सरकारपाशीं असलेल्या विपुल साधन-सामग्रीचा खाणींच्या विकासासाठी उपयोग होणार असल्यानें उत्पादनांतहि वाढ होईल हा आणखी एक लाभ यामध्यें आहे.

### उत्पादनांत क्रमशः घट

परंतु गेल्या सुमारें ४ वर्षांतील या खाणींचें उत्पादन पाहतां तें घटत असल्याचें दिसतें. सन १९५२ मध्यें या खाणींतून कमाल म्हणजे २,४३,६२९ औंस सोनें निघालें. तेव्हांपासून नंतर त्यांत (एक वर्षाचा अपवाद वगळतां) घट झाल्याचें दिसतें. अगदीं अलीकडचे म्हणजे १९६०–६१ चे आंकडे उपलब्ध असून त्या वर्षी १,३९,८५४ औंस उत्पादन झालें. तथापि, खाणींतून काढण्यांत येणारी सोन्याचा अंश असलेली माती किंवा दगड यांच्या प्रमाणांत मात्र तसा विशेष फरक पडला नाहीं.

### उत्पादनवाढीच्या योजना

यावरून एक गोष्ट दिसून आली कीं या खाणीच्या भरभराटीसाठी या विभागांत जोरानें आणि नेटानें संशोधन करून सोन्याच्या नवीन जागा शोधून काढणें आवश्यक आहे. तसेंच, उत्पादन-खर्च कमी करण्याकरतां जुनी झालेली यंत्रसामग्री बदलून तिच्या जागीं नवी कार्यक्षम यंत्रसामग्री बसविली पाहिजे.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत या खाणींच्या विकासासाठी राज्य सरकारनें १·५ कोटी रुपये खर्चाची एक योजना आखली आहे. त्यासाठी ३१·५ लक्ष रुपयांचें परकीय चलन खर्चावें लागेल असा अंदाज आहे. या योजनेंत नंदीदुर्ग खाण, चॅम्पियन रीफ खाण, म्हैसूर खाण यांचा विकास नि तदनुषंगिक कार्य यांचा अंतर्भाव आहे.

या एकूण खर्चापैकी ५४·५ लक्ष रुपये वेगळे ठेवण्यांत आले असून, कोलार सोन्याचा खाणीच्या विभागांत सोन्याच्या नव्या जागा शोधून काढण्याकरितां व त्यांचा विकास करण्यासाठी ह्या रकमेचा विनियोग होईल. सध्यां चालू असलेल्या खाणींतील उत्पादन घटत असल्यानें या संशोधनाची अत्यंत निकड निर्माण झाली आहे.

यापुढील संशोधनांत अधिक प्रमाणांत सोनें असलेली माती काढण्याबरोबर सोन्याचा अंश कमी असलेली माती शोधण्याकडेहि लक्ष देण्यांत यावें असें ठरविण्यांत आलें आहे. १९५९ पासून सुवर्णशोध विभाग या कामांत गुंतलेला आहे. म्हैसूरची खाण आतां रिती होत आली असली तरी नंदीदुर्ग खाणींत अजून सोनें मिळूं शकेल. शिवाय त्या खाणीच्या पश्चिमेकडील भागांतील नवीन संशोधनामुळें गेल्या ११ वर्षांत या भागांतील सुवर्णयुक्त मातीचा सांठा पूर्वीच्या अंदाजापेक्षा सातपट अधिक असल्याचें आढळून आलें आहे.

एकूण खाणविभाग कोलार जिल्ह्यांत १४,६५९ एकरांत पसरलेला असून तो मद्रास राज्याच्या सीमेनजीक आहे. ही खाण ताब्यांत घेतांना मूळ कंपनीला नुकसानभरपाईदाखल ६४ कोटी रुपये देण्यांत आले. या कामांत सुमारें १८,००० लोक गुंतलेले असून, जास्तींत जास्त खोल खाण भूगर्भात १०,००० फुटांपर्यंत गेली आहे. सुवर्णसांठ्याच्या शोधार्थ भूगर्भांत खोदत गेलेल्या विवरांची लांबी ६०० मैल भरेल.

---

## अहमदाबाद शहरांतील गलिच्छ वस्त्या

अहमदाबाद शहरांतील गलिच्छ वस्त्यांचें उच्चाटन करण्यासाठी अहमदाबादच्या कॉर्पोरेशनला निदान वीस कोटी रुपये खर्च करावे लागतील असा अंदाज म्युनिसिपल कमिशनर श्री. राजपाल ह्यांनीं केला आहे. त्यांनीं आणखी अशी माहिती दिली कीं अहमदाबाद शहरांत अनधिकृत रीत्या बांधण्यांत आलेल्या ४० ते ६० हजार झोपड्या असून त्यांची संख्या दरसाल ५,००० नीं वाढत चालली आहे. अनधिकृतरीत्या झोपड्या बांधल्याबद्दल ७०० लोकांवर खटले चालू आहेत. कॉर्पोरेशनच्या सभेंत गलिच्छ वस्त्या नाहींशा करण्याबद्दल चर्चा चालू असता विरोधी पक्षानें झोपड्या पाडण्यापूर्वी त्यांतील लोकांची सोय करण्यांत यावी असा ठराव आणला होता.

---

## मेट्टूर येथील वीजनिर्मिति केंद्र

मद्रास राज्याचें वीजमंडळ आणि रशिआचें यंत्रसामग्री निर्यात खातें ह्यांच्यांत एक करार करण्यांत आला आहे. मेट्टूर येथें उभारण्यांत येत असलेल्या वीजनिर्मिति केंद्राला जरूर ती यंत्रसामग्री पुरविण्याचें रशिआनें मान्य केलें आहे. यंत्रसामग्रीच्या पुरवठ्याला १९६३ अखेर प्रारंभ होईल. १९६५ अखेर सर्व पुरवठा पूर्ण करण्यांत येणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## कौटुंबिक हितगुज*

सुसंस्कृत पतिपत्नींनीं संसारांत सुसंगति राखण्यासाठी कसें वागावें, कटु सत्यावर आवरण कसें घालावें, फुकट मिळणाऱ्या गोष्टी कशा टाळाव्या, आहे या प्राप्तींत समाधानानें कसें राहावें, संसारांत स्त्रीची मिळकत सुख व समाधान निर्माण करते का, पाहुणचारांत आस्था, अगत्य व योजकता कशी हवी, पतिपत्नींनीं एकमेकाला कसें संभाळून घ्यावें, पडत्या काळांत परिस्थिति पाहून कसें वागावें, गृहस्वास्थ्य व्यक्तीच्या व्यावसायिक उत्कर्षाला कसें प्रेरक ठरतें, समाजाचें आपल्यावरील ऋण जाणून अनाथअपंगांचा आपल्या मिळकतींत वाटा आहे याची जाणीव ठेवून कसें वागावें, शेजारधर्माचें पालन, योजनाबद्ध कौटुंबिक जीवन, परधर्मसहिष्णुता, कुटुंब व समाजाबद्दलचा विशाल दृष्टिकोण, अशा अनेक प्रश्नांचा विचार या पुस्तकांत लेखकानें अत्यंत संयमानें केला आहे. त्यांत तक्रार नाहीं कीं आग्रह नाहीं. जो कांहीं उपदेश आहे तोदेखील 'कान्तासम्मित' असाच आहे. व्यावहारिक सत्यें घरगुती उदाहरणांतून पटवून देणें हें या पुस्तकाचें वैशिष्ट्य ! सुखी संसाराची गुरुकिल्ली प्रत्येक प्रकरणांत आढळेल. कितीतरी अर्थगर्भ वाक्यें या पुस्तकांत ठिकठिकाणीं भेटतात. उदाहरणार्थ —

'तरुणतरुणींनीं मधमाशींचा आदर्श ठेवावा, फुलपांखराचा ठेवूं नये; पण घडतें उलटेंच !'

'प्रपंच हाहि एक प्रकारचा व्यापार आहे; कुटुंबांतील सर्व लोकांची व्यवस्था पाहणारी, त्यांचा उत्कर्ष घडवून आणणारी ती सहकारी संघटना आहे.'

'श्रम आणि काटकसर यांतूनच संपत्ति निर्माण होते.'

'सुखाचें शिखर पायवाटेनेंच चढून जावें लागतें. मोटारीचा रस्ता तेथपर्यंत जात नाहीं.'

प्रकरणांतील आटोपशीरपणा हाहि या पुस्तकाचा एक गुण होय. गृहसौख्याला पारखा होत चाललेल्या, सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या सुशिक्षित समाजाला शर्करावगुंठित असे पाजलेले हे डोस उपकारकच ठरतील यांत शंका नाहीं. नवपरिणीतांनाच नव्हे, तर प्रत्येक कुटुंबीयालादेखील मार्गदर्शक वाटावें असेंच हें पुस्तक आहे.

—महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जाने. १९६३

*लेखक श्री. वा. काळे, किर्लोस्कर प्रेस प्रकाशन, स्वारगेट, पुणें ५, पृष्ठें ११९, मूल्य ३ रुपये.

## रशियाकडून 'मिग' विमानें आलीं

आवाजापेक्षा अधिक वेगानें भ्रमण करणारीं 'मिग' जातीचीं ४ विमानें रशिआकडून आलीं आहेत. हीं विमानें बोटीवरून आलीं असल्यानें तीं जोडण्याचें काम करण्यासाठी ६ रशियन तज्ज्ञहि भारतांत येणार आहेत. 'मिग' विमानांची पाहणी व अभ्यास करण्यासाठीं कांहीं हिंदी तज्ज्ञहि रशिआंत शिक्षणासाठी पाठविण्यांत आले होते. तेहि विमानांच्या जोडणींत भाग घेणार आहेत. ह्या विमानांचा कारखाना काढण्यासंबंधींचे नकाशे व आराखडे रशिअन तज्ज्ञ तयार करीत आहेत. संकल्पित कारखान्यांत रशिआ भांडवल गुंतविण्यासहि तयार आहे. कारखाना दोन ठिकाणीं विभागून काढण्यांत येणार आहे.


माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

कण आणि क्षण

लेखकः—श्री. वा. काळे

तिसरी आवृत्ति प्रसिद्ध झाली !

पृ. सं. १६०. किं. रु. ३=१०

व्हीनस प्रकाशन,

३८१ क, शनवार पुणें २.

सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्म-शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केट जवळ, मुंबई २.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड, मुंबई

[ दि विदर्भ सहकारी बँक लि. सम्मीलित ]

: मुख्य कचेरी : ९, बँक हाऊस लेन, फोर्ट मुंबई. टेलिफोन नं. २५५४७४-७५. ३८३११.

: विभागीय कचेरी : महाल : नागपूर. तारेचा पत्ता : फार्मर बँक

: बृहन्मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्लें (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर.

चेअरमन : प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ३ कोटी ८७ लाख |
| गंगाजळी व फंड | ... | १ कोटी ०५ लाख |
| ठेवी | ... | २५ कोटी ४८ लाख |
| खेळतें भांडवल | ... | ६१ कोटी ६१ लाख |

महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र शाखा व संलग्न बँका आहेत.

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, चिलें, वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

## भद्रावती येथील लोखंडाचा कारखाना

म्हैसूर राज्यांतील भद्रावती येथील लोखंडाच्या कारखान्याचें रूपांतर मिश्र व विशेष प्रकारचें पोलाद तयार करण्याच्या कारखान्यांत करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी सुमारें १७ कोटी रुपयांचें भांडवल लागणार आहे. रूपांतर पूर्ण झाल्यावर पहिल्या वर्षी कारखान्यांत ५०,००० टन पोलाद निर्माण करण्यांत येईल. त्यानंतर दुसऱ्या वर्षी उत्पादन ८०,००० टनां-पर्यंत वाढविण्यांत येईल. मध्यवर्ती सरकारच्या खाणी व भारी उद्योगधंद्याच्या खात्याचे मंत्री श्री. सुब्रह्मण्यम् ह्यांनीं ही माहिती सांगितली. ते असेंहि म्हणाले कीं, १७ कोटी रुपयांपैकी १२ कोटी रुपयांची रक्कम परदेशीय चलनाच्या स्वरूपांत लागणार आहे.

## जपान-रशिआ व्यापारी करार


जपान व रशिआ ह्यांनीं परस्परांत एक व्यापारी करार केला आहे. कराराची मुदत दोन वर्षांची असून त्यांत पैशाच्या देण्या-घेण्याचीहि तरतूद करण्यांत आली आहे. करारांतील शर्तीप्रमाणें उभयतां देशांत ३५० कोटी रुपयांची व्यापारी देवाण-घेवाण करण्यांत येणार आहे. जपान रशिआला बोटी पुरविणार आहे. त्यांत ५ बोटी मालवाहतुकीच्या असतील. त्यांचें प्रत्येकी वजन १२,००० टनांचें असेल. त्याशिवाय तेलाची वहातूक करणारीं ३५,००० टन वजनाचीं १३ जहाजें रशिआ घेणार आहे. उलट रशिआ जपानला ३५ ते ४० लाख टन अशुद्ध खनिज तेल पुरविणार आहे.

## स्वीडनकडून कागदाची देणगी

स्वीडनकडून भारताला ८,००० टन कागद देणगीदाखल मिळाला आहे. ह्या कागदाचा उपयोग प्राथमिक शाळांतील मुलांना लागणारीं पाठ्यपुस्तकें छापण्यासाठी करण्यांत येणार आहे. सुमारें २ कोटी पाठ्यपुस्तकें छापण्यांत येणार आहेत. कागदाचा पहिला ४,००० टनांचा हप्ता आला असून आणखी तितकाच कागद लवकरच पाठविण्यांत येणार आहे.


## दि बेळगांव बँक लि., बेळगांव

दि बेळगांव बँक लि, बेळगांवला १९६२ सालीं रु. २,२६,१०४=०९ नफा झाला. नोकरवर्गाला बोनस दिल्यानंतर निव्वळ नफा रु. २,१४,९००=३४ ( रु. २,३२,७९६=२५ ) उरला. गेल्या वर्षीच्या रु. ३,७९६=२५ (रु. ३,९७५=११ ) शिल्लकी नफ्याचा त्यांत समावेश आहे. ९% करपात्र डिव्हिडंड कायम ठेवण्याचें डायरेक्टरांनीं ठरविलें आहे. त्याला रु. ७२,००० ( रु. ८०,००० ) लागतील. रिझर्व्हेजूकडे रु. ४६,००० ( रु. ५०,०००) वर्ग केले जातील. इनकमटॅक्सची तरतूद रु. ९६००० (रु. ९०,००० ) आहे. शिल्लक राहिलेले रु. ९००=३४ पुढलि हिशेबांत ओढले जातील. बँकेकडील ठेवींची रक्कम १·८१ कोटी रु. ची १·९९ कोटी झाली आहे. कर्जे १·०८ कोटी रु.. ची ( ८५·८६ लक्ष रु. ) आहेत. सरकारी रोख्यांतील गुंतवणूक ५२·३९ लक्ष रु. ( ४२·९४ लक्ष रु. ) आहे. बँकेचें खेळतें भांडवल २·२१ कोटी रु. चें २·४० कोटी रु. झालें. आहे. ठेवींवरील व्याजाच्या दरांत वाढ आणि डिपॉझिट इन्शुअरन्स योजनेचा जादा बोजा, यामुळें निव्वळ नफा कमी दिसत आहे.

बेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
मुगभाट, मुंबई ४.
शाखा: ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.



BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting
GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA
MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS



वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७११००
बचतीच्या आकर्षक योजना
( १ ) स्पेशल सेव्हिंग — व्याजाचा दर २॥ टक्के
( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत — " ३। "
( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें — " ५ "
मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधी चौकशी करा.
मॅनेजर—ना. शं. कानिटकर

## आस्ट्रेलियांतील स्त्रियांचा दर्जा कमी प्रतीचा

आस्ट्रेलियांतील स्त्रियांचा दर्जा पुरुषांच्या मानानें कमी प्रतीचा आहे असा निष्कर्ष ब्रिटनमधील एका राज्यशास्त्रज्ञानें आपल्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत काढला आहे. तो म्हणतो कीं अमेरिकेंतील अगर युरोपमधील स्त्रियांना जो सामाजिक दर्जा आहे तसा आस्ट्रेलियांतील स्त्रियांना नाहीं. त्याचप्रमाणें त्यांना पाश्चात्य देशांतील स्त्रियांच्या इतकी संधीहि मिळत नाहीं. ऑस्ट्रेलियांतील मुलांना कमी दर्जाचें काम करण्यास पुरेल इतकेंच शिक्षण येतें. मुलांपेक्षा मुली शिक्षणहि लवकर सोडतात, आणि एकंदरीनें त्यांना देण्यांत येणारें शिक्षण कमी प्रतीचें असतें. खुद्द मुलींचे पालक आणि त्या स्वतः सुद्धां मुलींचें शिक्षण मुलांच्या शिक्षणापेक्षा कमी महत्त्वाचें मानतात. त्यांतहि व्यावसायिक शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या स्त्रियांच्या मार्गांत फार अडचणी असतात. स्त्रियांच्या शिक्षणाबद्दल असें पूर्वग्रहदूषित वातावरण असल्यामुळें आस्ट्रेलियांत हिशेबतपासनीस, वकील, शास्त्रज्ञ, दंतवैद्य ह्या व्यवसायांत स्त्रिया फारच थोड्या प्रमाणांत आढळून येतात. व्यापारधंद्यांत अगर सरकारी व निमसरकारी नोकऱ्यांतहि स्त्रिया आढळून येत नाहींत. ऑस्ट्रेलियाच्या प्रतिनिधीगृहांत एकहि स्त्री-सभासद नाहीं. पार्लमेंटच्या सिनेटमध्यें मात्र कांहीं स्त्री-सभासद आहेत. परंतु दोन सभागृहांपैकी सिनेट ही सभा कमी महत्त्वाची आहे. ऑस्ट्रेलियाच्या सोशल सायन्स रिसर्च कौन्सिलनें १९५९ सालीं ऑस्ट्रेलियांतील स्त्रियांची पहाणी करण्याचें ठरविलें; ती करण्यासाठी वरील ब्रिटिश तज्ज्ञाला पाचारण करण्यांत आलें होतें.

## अमेरिकेचे भांडवलदार बुजले ?

इंडिआ इन्व्हेस्टमेंट सेंटरचे न्यूयॉर्कमधील डायरेक्टर श्री. गोपाल मेनन भारतांत गुंतविल्या जाणाऱ्या खाजगी मालकीच्या अमेरिकन भांडवलाविषयीं बोलतांना म्हणाले कीं, अमेरिकन भांडवल भारतांत गुंतविण्याची आस्था कमी झालेली आहे, असे नाहीं. मात्र चीननें भारतावर आक्रमण केल्यापासून अमेरिकन कंपन्यांकडून भांडवल गुंतवणुकीविषयीं करण्यांत येणाऱ्या नव्या विचारणा थोड्याशा कमी झाल्या आहेत. चीननें आक्रमण केल्यामुळें भारताला लष्करी तयारी करावी लागणार आहे. पण त्याचा परिणाम आर्थिक विकास मंदावण्यांत न होता तो अधिक वेगानें होण्यांतच होईल. सध्यां भारतांत ३० कोटी डॉलर्स अथवा १४३ कोटी रुपयांचें खाजगी अमेरिकन भांडवल गुंतलेलें आहे. त्याशिवाय १२० अमेरिकन कंपन्या हिंदमध्यें भांडवल गुंतविण्याच्या योजना आखीत आहेत.

## परदेशीय प्रवाशांना आकर्षून घेण्यासाठी

भारतांत येणाऱ्या परदेशीय प्रवाशांच्या संख्येंत वाढ व्हावी म्हणून भारत सरकार प्रयत्न करीत आहे. स्पेन व इटलीमधील हौशी प्रवाशांचा व्यवसाय करणारे एजंटस् भारत सरकारच्या आमंत्रणावरून नुकतेंच मद्रासला येऊन गेले. दक्षिण भारतामधील प्रेक्षणीय स्थळें त्यांना दाखविण्यांत आलीं. परदेशीय प्रवाशांना भारतांत आकर्षित करण्याच्या दृष्टीनें त्यांची मदत घेण्यांत येणार आहे. पुढील महिन्यांत हैदराबाद येथें प्रवास-एजंटांच्या संघटनेची परिषद् भरविण्यांत येत आहे. ह्या परिषदेला हजर राहण्यासाठी आणखीहि कांहीं युरोपीय देशांचे प्रवास-एजंटस् येणार आहेत. परदेशीय प्रवाशांच्या सुखसोयींकडे लक्ष देण्याच्या बाबतींत एजंटांकडून मार्गदर्शन करण्यांत येणार आहे. दक्षिण भारतामधील हौशी प्रवाशांच्या व्यवसायाला चांगली चालना मिळण्याची शक्यता आहे.

## उद्योगधंद्यांवर आधारलेली अर्थव्यवस्था हवी

लंडनच्या आयर्न अँड स्टील इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष मि. फिनेस ह्यांनीं जमशेटपूर येथें बोलतांना भारताच्या अर्थव्यवस्थेसंबंधी आपले विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले कीं भारतामधील लोकांची खरेदीची शक्ति वाढविण्यासाठी भारतांत उद्योगधंद्यांचा विकास करण्यांत आला पाहिजे. भारतामधील लक्षावधी लोकांचें राहणीचें मान अगदीं निकृष्ट आहे. नवीन उद्योगधंदे उभारून लोकांचें राहणीचें मान सुधारण्याचे फार मोठे प्रयत्न भारत सरकार करीत आहे. दुर्गापूरचा पोलादाचा कारखाना उभारून ब्रिटननें ह्या प्रयत्नांना हातभार लावलेला आहे. कोणत्याहि उद्योगधंद्यांत उच्च दर्जाची तांत्रिक कुशलता आणि पुढाकार घेऊन काम करण्याची वृत्ति, हे दोन गुण आवश्यक असतात. त्यांची जागा कशालाहि घेतां येणार नाहीं. ह्या दोन्ही गुणांच्या बाबतींत भारतामधील परिस्थिति समाधानकारक आहे. मात्र येथील उत्पादनतंत्र आधुनिक पातळीवर आणण्याची जरूरी आहे. भारतामधील संशोधनाचें व विकासाचें कार्य रोजच्या जीवनाला उपयोगी पडेल असें असावयास पाहिजे. देशांतील संपत्तिसाधनांचा बेताच्या खर्चांत कसा विकास करतां येईल ह्या गोष्टीकडे अधिक लक्ष देण्यांत आलें पाहिजे. भारतांतील लोखंडाचा साठा कदाचित् इतर देशांच्या मानानें जास्त असेल, परंतु अल्युमिनम व पोलाद तयार करण्यासाठी लागणारा कोळसा ह्यांचा साठा पुरेसा नाहीं. तरी सुद्धां भारतानें आपली पोलाद् उत्पादन करण्याची पात्रता अगदीं थोड्या काळांत बरीच वाढविली आहे.

## पश्चिम जर्मनीची भारताला मिळणारी मदत

पश्चिम जर्मनीकडून भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी सुमारें २,०० कोटी रुपयांची मदत मिळणार आहे. १९६३ सालीं मिळणाऱ्या मदतीचा आकडा भारताला मदत करणाऱ्या मित्र देशांकडून येत्या एप्रिल अगर मे महिन्यांत निश्चित करण्यांत येईल. पश्चिम जर्मन सरकारकडून मिळणाऱ्या मदतीचे एक वैशिष्ट्य आहे. अविकसित देशापुढील अडचणी लक्षांत घेऊन जर्मनीनें मदतीप्रीत्यर्थ देण्यांत येणाऱ्या कर्जांपैकी कांहीं भाग निर्बंधरहित ठेवला आहे. म्हणजे असें कीं, विशिष्ट योजना पार पाडण्यासाठीच तो वापरला पाहिजे अशी अट ह्या भागाला नाहीं. अशा मुक्त कर्जांची भारताला अधिक जरूरी आहे.



## आस्ट्रेलियांतील स्त्रियांचा दर्जा कमी प्रतीचा

आस्ट्रेलियांतील स्त्रियांचा दर्जा पुरुषांच्या मानानें कमी प्रतीचा आहे असा निष्कर्ष ब्रिटनमधील एका राज्यशास्त्रज्ञानें आपल्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत काढला आहे. तो म्हणतो कीं अमेरिकेंतील अगर युरोपमधील स्त्रियांना जो सामाजिक दर्जा आहे तसा आस्ट्रेलियांतील स्त्रियांना नाहीं. त्याचप्रमाणें त्यांना पाश्चात्य देशांतील स्त्रियांच्या इतकी संधीहि मिळत नाहीं. ऑस्ट्रेलियांतील मुलांना कमी दर्जाचें काम करण्यास पुरेल इतकेंच शिक्षण येतें. मुलांपेक्षा मुली शिक्षणहि लवकर सोडतात, आणि एकंदरींनें त्यांना देण्यांत येणारें शिक्षण कमी प्रतीचें असतें. खुद्द मुलींचे पालक आणि त्या स्वतः सुद्धां मुलींचें शिक्षण मुलांच्या शिक्षणापेक्षा कमी महत्त्वाचें मानतात. त्यांतहि व्यावसायिक शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या स्त्रियांच्या मार्गांत फार अडचणी असतात. स्त्रियांच्या शिक्षणाबद्दल असें पूर्वग्रहदूषित वातावरण असल्यामुळें आस्ट्रेलियांत हिशेबतपासनीस, वकील, शास्त्रज्ञ, दंतवैद्य ह्या व्यवसायांत स्त्रिया फारच थोड्या प्रमाणांत आढळून येतात. व्यापारधंद्यांत अगर सरकारी व निमसरकारी नोकऱ्यांतहि स्त्रिया आढळून येत नाहींत. ऑस्ट्रेलियाच्या प्रतिनिधीगृहांत एकहि स्त्री-सभासद नाहीं. पार्लमेंटच्या सिनेटमध्यें मात्र कांहीं स्त्री-सभासद आहेत. परंतु दोन सभागृहांपैकीं सिनेट ही सभा कमी महत्त्वाची आहे. ऑस्ट्रेलियाच्या सोशल सायन्स रिसर्च कौन्सिलनें १९५९ सालीं ऑस्ट्रेलियांतील स्त्रियांची पहाणी करण्याचें ठरविलें; ती करण्यासाठी वरील ब्रिटिश तज्ज्ञाला पाचारण करण्यांत आलें होतें.

## अमेरिकेचे भांडवलदार बुजले ?

इंडिआ इन्व्हेस्टमेंट सेंटरचे न्यूयॉर्कमधील डायरेक्टर श्री. गोपाल मेनन भारतांत गुंतविल्या जाणाऱ्या खाजगी मालकीच्या अमेरिकन भांडवलाविषयीं बोलतांना म्हणाले कीं, अमेरिकन भांडवल भारतांत गुंतविण्याची आस्था कमी झालेली आहे, असे नाहीं. मात्र चीननें भारतावर आक्रमण केल्यापासून अमेरिकन कंपन्यांकडून भांडवल गुंतवणुकीविषयीं करण्यांत येणाऱ्या नव्या विचारणा थोड्याशा कमी झाल्या आहेत. चीननें आक्रमण केल्यामुळें भारताला लष्करी तयारी करावी लागणार आहे. पण त्याचा परिणाम आर्थिक विकास मंदावण्यांत न होता तो अधिक वेगानें होण्यांतच होईल. सध्यां भारतांत ३० कोटी डॉलर्स अथवा १४३ कोटी रुपयांचें खाजगी अमेरिकन भांडवल गुंतलेलें आहे. त्याशिवाय १२० अमेरिकन कंपन्या हिंदमध्यें भांडवल गुंतविण्याच्या योजना आखीत आहेत.

## परदेशीय प्रवाशांना आकर्षून घेण्यासाठी

भारतांत येणाऱ्या परदेशीय प्रवाशांच्या संख्येंत वाढ व्हावी म्हणून भारत सरकार प्रयत्न करीत आहे. स्पेन व इटलीमधील हौशी प्रवाशांचा व्यवसाय करणारे एजंटस् भारत सरकारच्या आमंत्रणावरून नुकतेंच मद्रासला येऊन गेले. दक्षिण भारतामधील प्रेक्षणीय स्थळें त्यांना दाखविण्यांत आलीं. परदेशीय प्रवाशांना भारतांत आकर्षित करण्याच्या दृष्टीनें त्यांची मदत घेण्यांत येणार आहे. पुढील महिन्यांत हैदराबाद येथें प्रवास-एजंटांच्या संघटनेची परिषद् भरविण्यांत येत आहे. ह्या परिषदेला हजर राहण्यासाठी आणखीहि कांहीं युरोपीय देशांचे प्रवास-एजंटस् येणार आहेत. परदेशीय प्रवाशांच्या सुखसोयींकडे लक्ष देण्याच्या बाबतींत एजंटांकडून मार्गदर्शन करण्यांत येणार आहे. दक्षिण भारतामधील हौशी प्रवाशांच्या व्यवसायाला चांगली चालना मिळण्याची शक्यता आहे.

## उद्योगधंद्यांवर आधारलेली अर्थव्यवस्था हवी

लंडनच्या आयर्न अँड स्टील इन्स्टिटयूटचे अध्यक्ष मि. फिनेस ह्यांनीं जमशेटपूर येथें बोलतांना भारताच्या अर्थव्यवस्थेसंबंधीं आपले विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले कीं भारतामधील लोकांची खरेदीची शक्ति वाढविण्यासाठी भारतांत उद्योगधंद्यांचा विकास करण्यांत आला पाहिजे. भारतामधील लक्षावधी लोकांचें राहणीचें मान अगदीं निकृष्ट आहे. नवीन उद्योगधंदे उभारून लोकांचें राहणीचें मान सुधारण्याचे फार मोठे प्रयत्न भारत सरकार करीत आहे. दुर्गापूरचा पोलादाचा कारखाना उभारून ब्रिटननें ह्या प्रयत्नांना हातभार लावलेला आहे. कोणत्याहि उद्योगधंद्यांत उच्च दर्जाची तांत्रिक कुशलता आणि पुढाकार घेऊन काम करण्याची वृत्ति, हे दोन गुण आवश्यक असतात. त्यांची जागा कशालाहि घेतां येणार नाहीं. ह्या दोन्ही गुणांच्या बाबतींत भारतामधील परिस्थिति समाधानकारक आहे. मात्र येथील उत्पादनतंत्र आधुनिक पातळीवर आणण्याची जरूरी आहे. भारतामधील संशोधनाचें व विकासाचें कार्य रोजच्या जीवनाला उपयोगी पडेल असें असावयास पाहिजे. देशांतील संपत्ति-साधनांचा बेताच्या खर्चांत कसा विकास करतां येईल ह्या गोष्टीकडे अधिक लक्ष देण्यांत आलें पाहिजे. भारतांतील लोखंडाचा साठा कदाचित् इतर देशांच्या मानानें जास्त असेल, परंतु अल्युमिनम व पोलाद तयार करण्यासाठीं लागणारा कोळसा ह्यांचा साठा पुरेसा नाहीं. तरी सुद्धां भारतानें आपली पोलाद् उत्पादन करण्याची पात्रता अगदीं थोड्या काळांत बरीच वाढविली आहे.

## पश्चिम जर्मनीची भारताला मिळणारी मदत

पश्चिम जर्मनीकडून भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी सुमारें २,०० कोटी रुपयांची मदत मिळणार आहे. १९६३ सालीं मिळणाऱ्या मदतीचा आकडा भारताला मदत करणाऱ्या मित्र देशांकडून येत्या एप्रिल अगर मे महिन्यांत निश्चित करण्यांत येईल. पश्चिम जर्मन सरकारकडून मिळणाऱ्या मदतीचें एक वैशिष्टय आहे. अविकसित देशांपुढील अडचणी लक्षांत घेऊन जर्मनीनें मदतीप्रीत्यर्थ देण्यांत येणाऱ्या कर्जांपैकीं कांहीं भाग निर्बंध-रहित ठेवला आहे. म्हणजे असें कीं, विशिष्ट योजना पार पाडण्यासाठीच तो वापरला पाहिजे अशी अट ह्या भागाला नाहीं. अशा मुक्त कर्जांची भारताला अधिक जरूरी आहे.



**आंतरराष्ट्रीय विकासमंडळाकडून मदत**— भारताच्या इंडस्ट्रिअल फायनॅन्स कॉर्पोरेशनला अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय विकासमंडळाकडून आणखी ५० लाख ते १०० लाख डॉलर्स मदत मिळण्याची शक्यता आहे. ही मदत बहुधा चालू वर्षाच्या जूनपूर्वी हातीं येईल. हिंदमधील खाजगी उद्योगधंद्यांकडून मदतीसाठी वाढती मागणी येत असल्यानें कॉर्पोरेशननें मंडळाकडे मदत मागितली होती. ह्यापूर्वी कॉर्पोरेशनला ३ कोटी डॉलर्सचीं कर्जें मिळालेलीं आहेत.

**हत्यारांसाठी मिश्र पोलादाचा कारखाना**—हिंदकडून योग्य त्या सवलती मिळाल्यास हत्यारांसाठी लागणारें मिश्र पोलाद बनविण्याचा एक कारखाना काढण्यास पश्चिम जर्मन सरकार तयार आहे. कारखाना काढण्याचें ठरविण्यांत आल्यास तो दुर्गापूरच्या पोलादाच्या कारखान्याजवळच उभारला जाईल. त्यामुळें भांडवली खर्च कमी लागेल.

**सायबेरिआंत हिऱ्याची खाण**— उत्तर सायबेरिआच्या बर्फमय प्रदेशांत रशिआनें हिऱ्यांच्या खाणींचें आणखी एक केंद्र स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ह्या भागांतील तपमान शून्यांशाच्या ५० ते ६० अंशांपर्यंत खाली जातें. खाणींत काम करणाऱ्या कामगारांना सध्यां तरी तंबूंतच राहावें लागेल. ह्या भागांत बांधण्यांत यावयाच्या इमारतींचे नमुने मुद्दाम तयार करण्यांत आले आहेत.

**बॉलबेअरिंगचा कारखाना**—पंजाब राज्यांत फरीदकोट येथें बॉलबेअरिंज तयार करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखाना खाजगी मालकीचा असून त्यासाठी २ कोटी रुपयांचें भांडवल लागेल. कारखाना काढण्याच्या कामीं एका हिंदी कंपनीनें जपानी कारखानदाराचें साह्य मिळविलें आहे. सुमारें सहा महिन्यांच्या आंतच उत्पादनास प्रारंभ करण्यांत येईल.

**सुरत शहरांतील रस्ते**—सुरत नगरपालिकेनें शहरांतील रस्ते डांबरी करण्यासाठी तीन वर्षांची योजना आंखली आहे. ती पूर्ण करण्यासाठी १० लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. सुरत शहरांतील रस्त्याची लांबी १०० मैल असून त्यांपैकी ३८ मैलांचे रस्तेच डांबराचे आहेत.

**बँक ऑफ चायनाच्या मालमत्तेचा लिलांव**—भारतावर चीननें आक्रमण केल्यानंतर गेल्या २ नोव्हेंबरला बँक ऑफ चायना गुंडाळण्यांत यावी असा अर्ज रिझर्व्ह बँकेनें कलकत्ता हायकोर्टाकडे केला होता. बँकेची मुख्य कचेरी कलकत्त्याला होती व एक शाखा मुंबईला होती. कलकत्ता हायकोर्टाच्या हुकमाप्रमाणें बँकेच्या जंगम मालाचा लिलांव करण्यांत आला. मालांत कचेरीला लागणारें सामानच मुख्यत: होतें. मुंबई येथील शाखेंतील सामानाचा लिलांव करून १॥ लाख रुपये हातीं आले. बँकेचें मुंबई शाखेचें भाडेंहि थकलेलें होतें.




**आंतरराष्ट्रीय विकासमंडळाकडून मदत**— भारताच्या इंडस्ट्रिअल फायनॅन्स कॉर्पोरेशनला अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय विकासमंडळाकडून आणखी ५० लाख ते १०० लाख डॉलर्स मदत मिळण्याची शक्यता आहे. ही मदत बहुधा चालू वर्षाच्या जूनपूर्वीं हातीं येईल. हिंदमधील खाजगी उद्योगधंद्यांकडून मदतीसाठी वाढती मागणी येत असल्यानें कॉर्पोरेशननें मंडळाकडे मदत मागितली होती. ह्यापूर्वीं कॉर्पोरेशनला ३ कोटी डॉलर्सचीं कर्जे मिळालेलीं आहेत.


**हत्यारांसाठीं मिश्र पोलादाचा कारखाना**—हिंदकडून योग्य त्या सवलती मिळाल्यास हत्यारांसाठीं लागणारें मिश्र पोलाद बनविण्याचा एक कारखाना काढण्यास पश्चिम जर्मन सरकार तयार आहे. कारखाना काढण्याचें ठरविण्यांत आल्यास तो दुर्गापूरच्या पोलादाच्या कारखान्याजवळच उभारला जाईल. त्यामुळें भांडवली खर्च कमी लागेल.

**सायबेरिआंत हिर्‍याची खाण**— उत्तर सायबेरिआच्या बर्फमय प्रदेशांत रशिआनें हिर्‍यांच्या खाणींचें आणखी एक केंद्र स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ह्या भागांतील तपमान शून्यांशाच्या ५० ते ६० अंशांपर्यंत खालीं जातें. खाणींत काम करणार्‍या कामगारांना सध्यां तरी तंबूंतच राहावें लागेल. ह्या भागांत बांधण्यांत यावयाच्या इमारतीचे नमुने मुद्दाम तयार करण्यांत आले आहेत.

**बॉलबेअरिंगचा कारखाना**—पंजाब राज्यांत फरीदकोट येथें बॉलबेअरिंज तयार करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखाना खाजगी मालकीचा असून त्यासाठीं २ कोटी रुपयांचें भांडवल लागेल. कारखाना काढण्याच्या कामीं एका हिंदी कंपनीनें जपानी कारखानदाराचें साह्य मिळविलें आहे. सुमारें सहा महिन्यांच्या आंतच उत्पादनास प्रारंभ करण्यांत येईल.

**सुरत शहरांतील रस्ते**—सुरत नगरपालिकेनें शहरांतील रस्ते डांबरी करण्यासाठी तीन वर्षांची योजना आंखली आहे. ती पूर्ण करण्यासाठी १० लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. सुरत शहरांतील रस्त्याची लांबी १०० मैल असून त्यांपैकी ३८ मैलांचे रस्तेच डांबराचे आहेत.

**बँक ऑफ चायनाच्या मालमत्तेचा लिलांव**—भारतावर चीननें आक्रमण केल्यानंतर गेल्या २ नोव्हेंबरला बँक ऑफ चायना गुंडाळण्यांत यावी असा अर्ज रिझर्व्ह बँकेनें कलकत्ता हायकोर्टाकडे केला होता. बँकेची मुख्य कचेरी कलकत्त्याला होती व एक शाखा मुंबईला होती. कलकत्ता हायकोर्टाच्या हुकमाप्रमाणें बँकेच्या जंगम मालाचा लिलांव करण्यांत आला. मालांत कचेरीला लागणारें सामानच मुख्यतः होतें. मुंबई येथील शाखेंतील सामानाचा लिलांव करून १॥ लाख रुपये हातीं आले. बँकेचें मुंबई शाखेचें भाडेंहि थकलेलें होतें.



### कच्च्या साखरेचें उत्पादन

नगर जिल्ह्यांतील ५ सहकारी साखर कारखान्यांनीं चालू हंगामांत ३ लाख पोतीं कच्ची साखर निर्माण केली. भारताच्या साखरेच्या निर्यातीच्या कार्यक्रमांत ह्या साखरेला महत्त्व प्राप्त झालें आहे. कारण परदेशांतील साखर कारखान्यांना हीच साखर लागते. ज्या परदेशी कारखान्यांना ती पाहिजे आहे त्यांच्या तांत्रिक तज्ज्ञांनीं उत्पादित साखर हवी तशी असल्याचें मान्य केलें आहे.

### भूकंपाबाबत रशियन शास्त्रज्ञांचा अभ्यास

भूकंपाबाबत रशियन शास्त्रज्ञांनीं अलीकडेच केलेल्या अभ्यासावरून असें आढळून आलें आहे कीं भूकंपाचें मुख्य उत्पादनकेंद्र भूपृष्ठापासून ७०० किलोमीटर इतकें खोल असूं शकतें. ह्यापूर्वी हें केंद्र २० किलोमीटरपेक्षा अधिक खोल नसावें असें मानण्यांत येत असे. जपानमधील भूकंपांची नोंदणी करणाऱ्या यंत्राच्या साह्यानें मिळालेल्या माहितीप्रमाणें भूकंपाचें कांहीं वेळापत्रकहि दिसून येतें. जपानमधील कांहीं भागांत १०० वर्षांचें भूकंपांचे वेळापत्रक आढळून येतें. पृथ्वीच्या रचनेंत जे निरनिराळे थर आहेत त्यांच्या उष्णतेंत पडणाऱ्या फरकामुळें भूकंप होतात. उष्णतेंत वाढ झाल्यामुळें अगर ती कमी झाल्यामुळें पृथ्वीच्या कवचावर आंतून दाब उत्पन्न होतो व परिणामी धक्के बसतात.

### बचतीसाठी दुरुस्त्या थांबविल्या

मध्यवर्ती सरकारच्या बांधकाम व पुनर्वसाहत खात्यानें मध्यवर्ती सरकारच्या इमारतींच्या दरसाल करण्यांत येणाऱ्या मामुली दुरुस्त्या न करण्याचें ठरविलें आहे. अगदीं जरूर तेवढ्याच दुरुस्त्या ह्यापुढें करण्यांत येतील. आणीबाणीच्या परिस्थितींत बचत व्हावी म्हणून हा निर्णय घेण्यांत आला आहे. त्यामुळें दरसाल १॥ कोटी रुपयांची बचत होणार आहे.

### भारतामधील पशुधनांत वाढ

भारतामधील पशुधन जगांत ६ व्या क्रमांकाचे आहे. १९६१ मध्यें करण्यांत आलेल्या गुरांच्या खानेसुमारीवरून असें दिसतें कीं भारतांत कामाला उपयोगी पडण्यासारखे ७·०६ कोटी बैल आहेत, प्रजननक्षम अशा ५·१ कोटी गाई आणि २·४ कोटी म्हशी आहेत. १९५६ पासून १९६१ पर्यंत भारतामधील पशुधनांत ११·४ टक्के वाढ झालेली आहे.

### ग्लिसरिनचा कारखाना

बडोद्याजवळ ग्लिसरिन तयार करण्याचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. स्फोटकांची निर्मिति करण्यासाठी त्याची गरज असते. सध्यां ग्लिसरिनची परदेशांतून आयात करावी लागते. संकल्पित कारखान्यासाठी २५ लाख रुपयांचें भांडवल लागेल आणि त्यांत दरसाल ४,००० टन ग्लिसरिन तयार करण्यांत येईल.

### संस्कृत ग्रंथांचीं हस्तलिखितें

सुरत येथील चुनिलाल गांधी विद्याभवन ह्या संशोधन संस्थेला २,००० दुर्मिळ संस्कृत ग्रंथांचीं हस्तलिखितें देणगी म्हणून मिळाली आहेत. श्री. दवे ह्या वृद्ध संस्कृत विद्वानानें ही देणगी दिली आहे. ह्या ग्रंथ-भांडारांत काव्य, व्याकरण, नाटक, न्याय, भविष्य, धर्म, इत्यादि विषयांवरील ग्रंथ आहेत.


## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः–युवरबँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :–०·५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :–३ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष–४¼ टक्के, २ वर्षे–४½ टक्के, ३ वर्षे–४¾ टक्के, ४ वर्षे–५ टक्के, ५ वर्षे–५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युमिलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा–विस्तार

शाखा–१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| गंगाजळी | रु. | ५,६६,००० |
| ठेवी | रु. | ३,३५,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ३,५०,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम., *जनरल मॅनेजर.*

रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. *चेअरमन.*



दूरध्वनि : २२४८३. तार : सेंको बँक

## पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ–पुणें शहर.

**व्याजाचे नवीन आकर्षक दर–**

| | | | |
|---|---|---|---|
| चालू ठेव | ... | ... | १/४ टक्के |
| सेव्हिंग्ज | ... | ... | ३ टक्के |

**कायम ठेव–**

| | | | |
|---|---|---|---|
| १ महिना | ... | ... | ३·३७ टक्के |
| ३ महिने | ... | ... | ३·५० टक्के |
| ६ महिने | ... | ... | ३·७५ टक्के |
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षे | ... | ... | ४·२५ टक्के |
| ३ वर्षांचे वर | ... | ... | ४·५० टक्के |

**याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.**

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या.*

*सर्व माहिति आनंदानें पुरवूं.*

वा. ग. अळतेकर,
बी. कॉम.
कार्यकारी संचालक.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व ' दुर्गाधिवास ' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.